कृषीवार्ता...

# देहाततर्फे द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांसाठी परिसंवादाचे आयोजन

## निर्यातक्षम द्राक्षांचे उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांचा नफा वाढविण्यासाठी आणि त्याकरिता आवश्यक सेवा व सुविधा देण्यासाठी उपक्रम




नाशिक २३ सप्टेंबर २०२२: भारतीय शेतकऱ्यांना उत्तम मूल्य मिळवून देण्यासाठी आणि त्यांच्या जीवनमानात सुधारणा करण्याच्या उद्देशाने भारतातील अग्रणीय सर्वात मोठ्या फुल स्टॅक ॲग्रीटेक व्यासपीठ असलेल्या देहात (DeHaat) या कंपनी मार्फत नाशिकमधील निर्यातक्षम द्राक्षांचे उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी प्रगत शेतकरी परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते.

द्राक्ष पिकांच्या जीवनचक्राबद्दल या परिसंवादामध्ये सर्वांगीण माहिती देण्यात आली. त्याचप्रमाणे निर्यातीचे व्यावसायिक व्यवहार करण्यासाठी देहात द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांना कसे सक्षम करते, याबद्दलची आवश्यक माहिती परिसंवादात देण्यात आली यामध्ये प्रामुख्याने उच्च दर्जाची शेती उत्पादने, माती परीक्षणाच्या सेवा, शेतकी तज्ज्ञांशी सल्ला-मसलत, आर्थिक आधार, बाजारपेठेशी संलग्नता, प्रमाणपत्र मिळविणे इत्यादींचा समावेश होता जेणेकरून या शेतकऱ्यांना त्यांचा निर्यात व्यवसाय सुलभपणे करता यावा.

प्रसिद्ध हवामान अंदाजतज्ञ पंजाब डख हे या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी द्राक्ष लागवडीशी संबंधित हवामानाच्या स्थितीबद्दल मोलाची माहिती पुरवली.या कार्यक्रमात संपूर्ण महाराष्ट्रातील ३५० पेक्षा अधिक द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांनी भाग घेतला. देहातचे वरिष्ठ टीम मेंबर तसेच कोरोमंडल इंटरनॅशनल लिमिटेड आणि सिंजेंटा इंडिया यांसारख्या प्रतिष्ठित कंपन्यांचे अधिकारी परिसंवादाला उपस्थित होते.

संपूर्ण सुसज्ज आणि शेती तंत्रज्ञानातील सोल्यूशन प्रोव्हाईडर असलेल्या या संस्थेने गेल्या काही वर्षांमध्ये १० लाखांपेक्षा अधिक शेतकऱ्यांशी संपर्क साधला आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून या शेतकऱ्यांच्या द्राक्ष निर्यात व्यवसायात वाढ करण्यासाठी त्यांच्यासोबत काम करण्याचे तसेच मोलाच्या सेवा पुरविण्याचे देहातचे उद्दिष्ट आहे. यातून या शेतकऱ्यांना भरीव नफा मिळू शकतो.

देहातचे वरिष्ठ उपाध्यक्ष रोहित सरीन म्हणाले की शेतकऱ्यांना निर्यातीसाठी त्यांचे उत्पादन आणि दर्जा वाढविण्याचे बळ मिळावे, यासाठी आपल्या मजबूत आणि बुद्धिमान सेवांच्या माध्यमातून द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांना भरीव मूल्य मिळवून देण्याचे देहातचे उद्दिष्ट आहे.






कृषीवार्ता...

## आय सी लीफ आणि पीक सल्लागार - आय सी एल इंडिया चा लोकार्पण सोहळा हॉटेल सयाजी इंटरनॅशनल वाकड पुणे येथे संपन्न




दिनांक १४.०९. २०२२ रोजी आय सी एल इंडिया द्वारा आय सी लीफ पर्ण परीक्षण आणि पीक सल्लागार या संगणकीय टूल चे लोकार्पण दापोली कृषी विदयापीठाचे कुलगुरू डॉ. एस. डी. सावंत तसेच दापोली कृषी विदयापीठाचे, माजी कुलगुरू डॉ. के. इ. लवांदे आणि महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. वाय. एस. नेरकर यांच्या हस्ते करण्यात आले.

या लोकार्पण सोहळ्यात संबोधन करत असताना कुलगुरू डॉ. एस. डी. सावंत म्हणाले कि पानांची तपासणी एक्स आर एफ व एन आई आर सारख्या अद्यावत तंत्रज्ञानाद्वारे अचूकपणे करणे आता सहज शक्य झाले आहे. ए आर ओ तसेच सी एफ पी एन च्या तांत्रिक सहकार्याने हे तंत्रज्ञान इस्राईल हुन भारतात आणले गेले हे विशेष. आधीच्या वेट केमेस्ट्री पेक्षा सुलभ, सोपे, अति जलद आणि अचूकपणे पानांची तपासणी करून विविध अन्नद्रव्यांच्या कमतरता समजून घेऊन नेमकेपणाने अन्नद्रव्यांचे/खतांचे व्यवस्थापन करणे आता सहज शक्य झाले आहे. आय सी लीफ च्या माध्यमातून पानांची तपासणी करून पीक वाढीच्या गरजांनुसार तसेच अपेक्षित उत्पादन घेण्यासाठी पीक सल्लागार हे टूल सुद्धा शेतकऱ्यांना मार्गदर्शक ठरणार आहे. भविष्यामध्ये याचा फायदा शास्वत उत्पादन घेण्यासाठी तर होणारच आहे शिवाय याच्या माध्यमातून जमिनीचे आरोग्य सुद्धा चांगल्याप्रकारे जपता येणार आहे.

माजी कुलगुरू डॉ. के. इ. लवांदे यांनी आय सी एल च्या शेती व शेतकऱ्यांचा कायापालट करणाऱ्या या इस्रायली तंत्रज्ञानाचा फायदा हा आता भारतीय शेतकऱ्यांना होऊन त्यांचे उत्पादन, उत्पादकता व शेतमालाची गुणवत्ता वाढवून अन्नद्रव्यांवरती नेमकेपणाने खर्च करून निव्वळ नफा वाढवता येणार आहे असे नमूद केले. महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. वाय. एस. नेरकर यांनी हे तंत्रज्ञान भारतीय शेतीस निशचितपणे एक नवी दिशा देणारे ठरेल असा विश्वास व्यक्त केला आणि आय सी एल च्या सर्व उपक्रमांना शुभेच्छा दिल्या.

प्रो. उरी येर्मियाहु ए आर ओ (ऍग्रीकल्चर रिसर्च ऑर्गनायझशन) इस्राईल यांनी बोलताना नमूद केले कि आय सी लीफ हे पाने तपासणीचे अद्यावत तंत्रज्ञान भारतीय शेतकऱ्यांना पर्वणी ठरणार असून शेतकऱ्यांना अचूक निष्कर्षाद्वारे नेमकेपणाने अन्नद्रव्य व्यवस्थापन करता येणार आहे. एक्स आर एफ व एन आई आर हे अतिविशेष मशीन द्वारे घेतल्या जाणाऱ्या नोंदी या अचूक असणार असून त्याचा फायदा हा सर्व सामान्य शेतकऱ्यांना होणार असल्याबद्दल माहिती दिली. इस्राईल सोबत आता भारत पण शेती क्षेत्रात अति प्रगत वाटचाल करेल अशी खात्री यावेळी बोलताना दिली.

डॉ. मेनाखेम असराफ, रिजनल ऍग्रोनॉमिस्ट सी एफ पी एन (सेंटर फॉर प्लॅन्ट नुट्रीशन अँड फर्टिलायझेशन) च्या तांत्रिक सहकार्याने या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा विकास करण्याबद्दल माहिती दिली तसेच सी एफ पी एन द्वारे चालणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती या कार्यक्रमात त्यांनी दिली. आय सी लीफ हे तंत्रज्ञान सर्वार्थाने भारतीय शेतीस एक नवी दिशा देणारे ठरेल असे सांगितले.

श्री सगी कात्झ आणि श्री लिरान शम्युएल यांनी क्रॉप ऍडव्हायजर या टूल बद्दल सविस्तर माहिती दिली. आय सी एल द्वारा या कंपनीची स्थापना २०२१ मधेय करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली क्रॉप ऍडव्हायजर च्या माध्यमातून शेतकऱ्यास नेमकेपणाने तसेच आवश्यकतेनुसार खत व्यवस्थापन करता येणे शक्य होणार असल्याची त्यांनी माहिती दिली. माहिती तंत्रज्ञान, ऐतिहासिक डेटा, सॅटेलाईट, हवामान आदींचा फायदा हा आता शिफारशींमध्ये करता येणार असल्याचे त्यांनी नमूद केले. श्री लिरान शम्युएल यांनी या टूल चा वापर नेमका कसा करावयाचा याचे प्रात्यक्षिक या वेळी करून दाखवले.

श्री अनंत कुलकर्णी, सी ई ओ तथा प्रेसिडेंट आय सी एल इंडिया यांनी आय सी एल द्वारे चालवण्यात येणाऱ्या उपक्रमांबद्दल तसेच उत्पादनांबद्दल माहिती देऊन याचा फायदा शेतकऱ्यांनी घ्यावा असे आव्हान या वेळी केले.

श्री ओंकार नाथ हेड स्ट्रॅटेजि इम्प्लिमेंटेशन अँड डिमांड जनरेशन यांनी सर्वांचे स्वागत केले आणि डिजिटल माध्यमातून आणि संगणकीय टूल येणाऱ्या काळात शेती साठी वरदान ठरतील असे मत व्यक्त केले. श्री संजय बिरादार प्रमुख शास्त्रज्ञ आय सी एल इंडिया यांनी आभार प्रदर्शन केले. या कार्यक्रमास शेती क्षेत्रातील विविध मान्यवरांची उपस्थिती लाभली.